संक्षिप्त खटला नं. 40463 /२०२6
सरकार विरुध्द
नि. क्र.

## भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २८६ अन्वये संक्षिप्त संपरिक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख.

श्री. एस. बी. पाटील, न्यायदंडाधिकारी वर्ग–१, मोटार वाहन न्यायालय, पुणे यांचे न्यायालयात.

१. अपराध घडल्याचा दिनांक :– 17/04/२०२6

२. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक :– 17/04/२०२6

३. तक्रारदाराचे नांव व हुद्दा, :– महाराष्ट्र सरकार तर्फे प्रभारी अधिकारी वाहतुक विभाग, सिंहगड रोड

४. आरोपीचे नांव, वय व पत्ता :– मीत जिलेश खाबिया
रा. शिरूर, पुणे

५(अ) अपराधाचा तपशिल. :–

आपण दिनांक 17/04/२०२6 रोजी २1:३5 वाजण्याच्या सुमारास सिंहगड रोड, पुणे येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन क्र. MH-12-JU-8121 हे वाहन दारु पिऊन मद्यार्कांच्या अंमलाखाली असतांना मानवी जिवीतास धोका होईल अशाप्रकारे भरधाव वेगात सार्वजनिक रस्त्यावर चालवुन तुम्ही मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४ व १८५ प्रमाणे गुन्हा केल्याचे तोहमत आहे व सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे.

त्याचप्रमाणे तुम्ही वरील तारीख, वेळ व ठिकाणी उपरोक्त वाहन सार्वजनिक रस्त्यावर चालवितांना मिळुन आलात त्यावेळी आपणाकडे आपला वाहन चालविण्याचा परवाना सादर न करता तुम्ही मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १३०(१) मध्ये दिलेल्या तरतुदींचे उल्लंघन करुन मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १७७ प्रमाणे गुन्हा केल्याचे तोहमत आहे व सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे.

**६. आरोपीचे प्रतिकथन :–**

प्र.क्र.१ :– तुम्हाला पोलिस पेपर्सची नक्कल मिळाली काय ?
उत्तर :– होय.
प्र.क्र.२ :– तुम्हाला तुमचेवर ठेवणेत आलेला दोषारोप वाचून दाखविला तो तुम्हांला समजला काय ?
उत्तर :– होय.
प्र.क्र.३ :– तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर :– होय, मला गुन्हा कबुल आहे.

Mkhabiya
आरोपीची सही

न्यायदंडाधिकारी वर्ग–१,
मोटार वाहन न्यायालय, पुणे.

## न्यायनिर्णय

आरोपी त्याच्या वकीलासह न्यायालयासमोर हजर झाला. त्याचेविरुध्द लावण्यात आलेल्या आरोपांचा तपशिल नोंदवुन त्याचे प्रतिकथन नोंदविले असता त्याने स्वखुषीने गुन्हा कबुल असल्याचे सांगितले. तसेच गुन्हा कबुल करतांना त्याचेविरुध्द कुठल्याही प्रकारचा दबाव किंवा प्रलोभन नसल्याचे त्याने सांगितले. आरोपीस गुन्हा कबुल केल्यास शिक्षा होऊ शकते याची जाणीव करुन दिली तरीही त्याने गुन्हा कबुल असल्याचे सांगितले. यावरुन आरोपीची कबुली स्वखुषीने आहे असे दिसुन येते.

२. आरोपीला शिक्षेबाबत विचारले असता त्याने प्रस्तुतचा त्याचा गुन्हा पहिलाच असुन अनावधानाने सदरचा गुन्हा घडल्याचे व त्याची आर्थिक परिस्थिती गरीबीची आहे असे सांगितले. त्यामुळे कमीत कमी दंड करावा अशी त्याने विनंती केली. आरोपीच्याविरुध्द लावण्यात आलेला आरोप आणि त्याची आर्थिक परिस्थिती याचा सारासार विचार करता त्याला द्रव्यदंडाची शिक्षा करणे न्यायोचित होईल या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करुन आहे.

## :- आदेश -:

१. आरोपी ....मीत....निलेश....खाबिया.......... याला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २८६ प्रमाणे मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४, १८५ आणि कलम १३०(१) सह कलम १७७ अन्वये शिक्षापात्र गुन्ह्यासाठी दोषी धरण्यात येते.

२. आरोपी याला मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८५ अन्वये केलेल्या अपराधाबाबत रक्कम रु.१००००/- (अक्षरी रु दहा हजार मात्र ) इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे, द्रव्यदंड न भरल्यास १० दिवस साधी कैद अशी आणि कलम १८४ अन्वये केलेल्या अपराधाबाबत रक्कम रु.१००० /- (अक्षरी रुपये एक हजार मात्र) इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे, द्रव्यदंड न भरल्यास ०२ दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

३. आरोपी याला मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १३०(१) सह कलम १७७ अन्वये केलेल्या अपराधाबाबत रक्कम रु.५०० /- (अक्षरी रु. पाचशे फक्त) इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे, द्रव्यदंड न भरल्यास १ दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावण्यात येत आहे

Sd/- 14/8/2026

दिनांक- १४/०८/२०२६

Fine of Rs. 11500/-
Paid on 14/8/2026
Vide R. No. 011787/
Sd/- 14/8/26
Sr. Clerk

(एस. बी. पाटील),
न्यायदंडाधिकारी वर्ग-१,
मोटार वाहन न्यायालय, पुणे.

pcj